# कुलाबा-सिप्झ मेट्रो ३ साठी ८ डब्यांची दुसरी ट्रेन आंध्र प्रदेशातून मुंबईत दाखल

■ मुंबई



**गोरेगाव** येथील आरे दुग्ध वसाहतीतील सारिपुत नगर येथे मुंबई मेट्रो-३ साठी लागणारी दुसरी आठ डब्यांची ट्रेन दाखल झाली आहे. गुरुवारी २९ डिसेंबर रोजी रात्री हे डबे आंध्र प्रदेशातील श्रीसीटी येथून मुंबईत दाखल झाले. कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा भूमिगत मार्ग ३३.५ किमी लांबीचा आहे. या मार्गावर आवश्यक असलेल्या ३१ मेट्रो ट्रेनपैकी हा दुसरा संच आहे.

या आठ डब्यांची जोडणी करून या गाडीची चाचणी सुरू केली जाणार आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू करण्याचे उद्दिष्ट असल्याने या टप्प्याच्या आणि कार शेडच्या कामाला वेग आला आहे. गेल्या आठवड्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आरे कार डेपो आणि मरोळ नाका स्टेशन दरम्यानच्या 'प्रोटोटाइप' ट्रेनच्या 'डायनॅमिक' आणि स्थिर चाचण्या पूर्ण केल्या. या चाचणीमध्ये ट्रेन सुरक्षित आहे की नाही हे तपासण्यात आले.

याचबरोबर ही ट्रेन जास्त भार हाताळू शकते का हे तपासण्यासाठी डब्यांच्या आत प्रवाशांऐवजी डमी वजनासह ट्रेन विविध वेगाने चालवण्यात आली. यात 'ब्रेकिंग', 'सिग्नलिंग,' 'दूरसंचार,' ऑपरेशनल सिस्टीम आणि ऊर्जेचा वापर या बाबींची चाचणी करण्यात आली.